REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# भेदिक फडातील लावणीचे स्वरूप

**डॉ. महादेव देशमुख**
संगमेश्वर कॉलेज, सोलापूर.

**प्रस्तावना:**

. भेदिक फडातील लावणीची परंपरा फार पूर्वीपासूनची आहे. कवितेमधूनच वेद, शास्त्र, पुराण, उपशिषद, रामायण, महाभारत यामधील विषय असतात. जिज्ञासूंना या कवितेमधून अध्यात्मक, नीती वगैरे समजते. याशिवाय कूटप्रश्न, यक्षप्रश्न, यातील गूढही समजते. सर्व कुतूहलापोटी ऐकायला मिळते म्हणून ही कविता ऐकण्यासाठी प्रेक्षक/श्रोता वर्ग मोठी गर्दी करीतो. अधात्म जाणून घेण्याच्या तीव्र इच्छेने प्रेक्षक/श्रोता महिनोनमहिने ही कविता रात्रभर ऐकतात. याच काळात ही कविता लोकप्रिय झाली. या कविता ग्रामदैवताच्या जत्रा, यात्रा, ऊरूस यानिमित्ताने हमखास सादर करतात. श्रोत्यांची गर्दी खूप होते. हा कार्यक्रम ऐकण्यासाठी विशेष करून पुरुषवर्गच असतो. कवितेतील काही शब्द लज्जा उत्पन्न करणारे असतात म्हणून स्त्रीवर्ग कार्यक्रम ऐकण्यास येत नसे. कालांतराने या कवितेत बदल होत गेले. कवितेचे स्वरूप सादरीकरणाचे असल्याने ती प्रयोगरुपात सादर झालेली दिसते. म्हणून भेदिक फडात लावणीचे प्रयोगरुपाचेच असते. या लावणीत प्रयोगरुपाची सर्व वैशिष्ट्ये पाहावयास मिळतात.

भेदिक फडामध्ये कलगीपक्ष व तुरापक्ष हे दोन पक्ष या लवणीला शिव–शक्ती, पुरुष–प्रकृति, ब्रह्म–माया म्हणून तर पुढे सवाल जबाब ही अशा नावाने ओळखतात. एका पक्षाने रचना सादरीकरणे व त्यामधून प्रश्न विचारणे व उत्तराची अपेक्षा या कवितेमधून यक्षप्रश्न कूटप्रश्नांची उत्तरे ही मिळतात. येथे श्रोतावर्ग मोठ्या प्रमाणात आकर्षित होत असतो हेही दिसते.

अशा प्रकारची कविता विपुल प्रमाणात आहे. यामध्ये अध्यात्माचेही विश्लेषण केलेले असते. भेदिक फडात ही कविता सादर करतात. गेय असे स्वरूप असते. संगीत निर्मितीसाठी डफ, तुणतुणे, टाळ, मंजिरी, इत्यादी वाद्यांचा वापर केला जातो. ही कविता पुर्णतः अध्यात्म विषयासंबंधी असल्याने श्रोत्यांच्या अभिरुचीनुसार बदलते. पुढे ही कविता भेदिक तमाशा म्हणून ओळखली जाऊ लागली. या भेदिक तमाशाच्या विकासाबद्दल पां.ल. जैतापकर म्हणतात, अस्पृश्य मानले गेलेले लोकही त्यावेळी तेहतीस कोटी देवांना भक्तिभावाने मानणारे व हिंदू धर्माचे नीतीनियम पाळणारेच होते, अस्पृश्य लोकांप्रमाणे आपल्याही पदरात पुण्य पडावे म्हणून ते श्रावण महिन्यात रामविजय, हरिविजय, पांडव प्रताप वगैरे धार्मिक ग्रंथाची पारायणे करीत, या पारायणातून एकतारीवर आपल्या सुरेल आवाजात ओवीबद्ध ग्रंथ वाचन करणारे व त्या ग्रंथाचे रसाळ निरुपण करणारे लोकही त्यांच्यात निर्माण झाले व त्यायाग त्यांना धार्मिक ग्रंथाचा आणि शास्त्रांचा परिचय झाला. या ग्रंथाच्या आणि शस्त्रांच्या आधारावर कवी पिराजीबुवा (करंजेकर) कवी बाबाजी वगैरे कवींनी पुष्कळ कवने तयार केली आणि आपल्या परंपरा पुढे चालविल्या. कवी पिराजीबुवा करंजेकर हे भेदिक तमाशा क्षेत्रातील 'महाकवी' म्हणून ओळखले जात. त्यांच्या शिष्य परिवार मोठा होता. कवी पिराजीबुवा हे तुरापक्षाचे तर कवी बाबाजी हे कलगीपक्षाचे कवी होते.

भेदिक फडातील लावणीची ही समृद्ध परंपरा ध्यानात येते. हा कलाप्रकार करणारा विशिष्ट समाज आणि त्यांच्यातून तयार होणारे दोनही पक्षाचे शाहीर भेदिक तमाशा रुढ करतात. या भेदिक लावणीमध्ये गवळण, आणि आध्यात्मिक पदरचना सादर करतात.

फडातील लावणी पहा–

गण–निराकारी (कवी पिराजीबुवा)
गणुराज महाराज, तुम्हाला माझी विनंती
प्रसन्न व्हावे, मला सभेमधी द्यवी ज्ञानमति ।।१।।
किती अवतार झाले, गणुराज नाही त्यांची गणति

जग उद्धराया, अवतार धरला गणपती ।।२।।
केव्हढा नामाचा प्रताप, नामाचे गुण वर्णू किती
गण मनल्या वाचनू, कोणी वाचिना शास्त्र पोथी ।।३।।
तिन्ही ताळामधी अधिनाम तुझे, नमावा गणपती
तिन्ही ताळ भरून, उरली जागा नाही रिती ।।४।।
ब्रह्म, विष्णू, महेश, त्रिगुण नव्हती उत्पत्ती
कळावंती, सावित्री, शंभोला नव्हती पार्वती ।।५।।
त्या आधी असेल, म्हणून नमला गणपती
निर्विकार, निर्गुण पुढे मग झाल्या सगुणमूर्ती ।।६।।
लवंगरे– करंजात कवी पिराजी हाती घेऊन पोथी
सावळा नारूची जोडी, करंजगाव असे त्यांची वस्ती ।।७।।

या गणामधून गणेश, ब्रह्म, विष्णु, महेश, पार्वती इत्यादी देवदेवतांना नमन, वंदन केलेले दिसते. त्याहीपुढे जाऊन शाहीर, निर्विकार, निर्गुण सगुणमूर्तीलाही त्रिवार वंदन करतात. शेवटी वेद, पुराण, उपनिषद या ग्रंथाचा आधार आणि आपण प्रतिपक्षांवर चाल करतो. त्याला यश मिळावे, नाव मिळावे ही धारणा व्यक्त करतो. या गणाचे रचनेचे स्वरूपही प्रयोगरूपच. म्हणून ही रचना लोकप्रिया झालेली आहे. या रचनेच्या सादरीकरणानंतर लगेच गवळण रचना सादर करून समोरच्या प्रेक्षकवर्गाला खिळवून ठेवतात. रचनेमध्ये गुरु, श्रीकृष्ण यांना प्राधान्य दिलेले असते. त्यानंतर पदरचना सादर करतात. रचनामधून छक्कड, धोबीण, मढ्याची लावणी, देवाची वंशावळ इत्यादी विषयांना प्राधान्य असते. या रचनामध्ये यक्षप्रश्न, कूटप्रश्न असतात पुढील रचना पहा–

पद–बीजाचे (कवी पिराजीबुवा)
भले–भले पंडित, बोलणे करता गर्वाचे
खुण पुसता, उत्तर होईना शाहीर शक्तिचे ।।१।।
अस्तुरीपाशी, दूध–अमृत म्हणता कशाचे
रक्ताचे की पण्याचे, कसे झाले शुभ्र रंगाचे ।।२।।
घट आधी का पातळ, कसे मन शांत होईल तुमचे
रविमंथन केल्याविण, आत्मगुज कसे कळेल त्याचे ।।३।।
बीज पुरुषाचे दिले अस्तुरीला बीज आहे दुधाचे
कोरे होते, पण प्रकाश करायला पाणी केले त्याचे ।।४।।
बीज पुरुषाचे दिले घट होते, पण पाणी केले त्याचे
अशावरून ऐन शाहिरा, बीज आहे दह्याचे ।।५।।
कोरे होते पण पाणी केले, कर्तृत्व देवाचे
विरजण टाकून दही केले, मग प्रीत दुधाचे ।।६।।
मंथन करून नवनीत काढले, तेच बीज मुळचे नव्हे
पाखडमत, बोलणे ऐका शास्त्राचे ।।७।।
प्रसंत घडला म्हणून बोलणे, निघाले गुरु घरचे
हे प्रथम बीज कशाचे, सांगा शाहीर शक्तिचे ।।८।।
एवढी खुण सांगा, शहाणपण यातच कळले तुमचे
काय वस्तुचे बीज केले कवी नाव सांगा त्याचे ।।९।।
खडा आहे का मोती, शहाणपण पाहू गुरु घरचे
करत तीर्थ आपार कलंकित, एकच बीज मूळचे ।।१०।।

गुरु भिवबा वस्ताद माझे, विज्ञान सागराचे
केळजगाच ठिकाण त्यांचे फलटण देशाचे ।।१।।

शाहीर बीज, दूध, रक्त आणि पाणी, दही, नवनीत (लोणी) इत्यादी प्रतिमांचा वापर प्रश्नांमधून कोडे कसे घातले, प्रतिस्पर्धी शाहीरांना नामोहरम केले जाते. येथे त्यांच्या बुद्धीला आव्हान गुरु, तीर्थ यांचेही महात्म्य. यामधून शाहीरांच्या आकलनतेचे, शीघ्रतेचे स्वरूप शेकल्या शब्दांनी त्याच्या बौद्धिक क्षमतेची अवहेलना, स्वतःचा गुरुपरंपरेचा जागोजागी अभिमानास्पद वावरतो. जाता जाता पुढे कूटप्रश्नही विचारतो. कालांतराने श्रोत्यांच्या प्रेक्षकांच्या अभिरुचीनुसार रचनेतही बदल होत गेलेले, निव्वळ आध्यात्मिकच ऐकून प्रेक्षकांचे मन भरत नाही तर त्याला मनोरंजनाची आवश्यकता वाटते. म्हणून येथे श्रोत्यांच्या आग्रहास्तव भेदिक तमाशामध्ये रंजन प्रधान रचनाही सादर होतात. त्याचेही स्वरूप बदलत गेले. या विकसित प्रयोगरूप कलेबद्दल पां.ल. जैतापकर म्हणतात, 'भेदिक तमाशा व रंगीत तमाशा कलेचे दोन्ही प्रकार त्यावेळी एकदमच चालू होते. पुढे रंगीत तमाशा व्यवसायाकडे वळला.'

या रंगीत तमाशामध्ये शृंगाराला प्राधान्य, त्यामुळेच श्रोता रंजन प्रधान गोष्टीकडे आकर्षित, यामधूनच पुढे पेशवेकालीन तमाशाचाही उगम होऊन त्यामध्येही शृंगाराला प्राधान्य दिलेले आढळते. येथेच फडातील लावणीचे स्वरूप दिसून येते.

**संदर्भ :–**

१) पां.ल. जैतापकर– तमाशा कला अंतरंग आणि रंक प्रकाशन, पां.ल. जैतापकर, मुंबई–१०.
२) शाहीर बापू पटेल– देगाव नाका, सोलापूर– हस्तलिखित बाडामधून
३) शाहीर बाबू घिसाडी मोहोळ– हस्तलिखित बाडामधून
४) पां.ल. जैतापकर–उनि–पृ. २१.
५) शाहीर दगडू बुट्याबा जाधव– हस्तलिखित.
६) शाहीर सुरेश बेगमपुरे– हस्तलिखित